(दिनांक ३ डिसेंबर २०२२)

# लोकमंगल औद्योगिक प्रशिक्षण संस्थेच्या विद्यार्थ्यांनी जागतिक दिव्यांग (अपंग) दिन दिव्यांग विद्यार्थ्यांसमवेत केला साजरा



वडाळा :-

लोकमंगल औद्योगिक प्रशिक्षण संस्थेच्या च्या विद्यार्थ्यांनी माऊली मतिमंद विद्यालय, वडाळा येथे दिव्यांग विद्यार्थ्यांसोबत जागतिक दिव्यांग (अपंग) दिन साजरा केला. यावेळी उपस्थित सर्व अपंग व दिव्यांग बांधवांना खाऊ तसेच शैक्षणिक साहित्य देऊन त्यांचे स्वागत करण्यात आले.

यावेळी माऊली विद्यालयाचे प्राचार्य ,श्री संजय कुमार वाघमारे सर,श्री मोकाशे सर (क्लार्क ) ,करपे मॅडम (परिचारिका ) श्री बळीराम शिंदे (काळजी वाहक ) श्री गुंड सर विशेष शिक्षक, श्री पचकावडे सर ( विशेष शिक्षक ),श्री दराडे सर (विशेष शिक्षक), श्री भोसले सर (क्रीडा शिक्षक ),श्री अजित परबत(वसतिगृह अधीक्षक ) ,फुलमारे मॅडम(विशेष शिक्षक)
निरंजन मुरुडकर (काळजीवाहक ) संगीता परीट मॅडम आणि लक्ष्मी देवकर (स्वयंपाक व्यवस्थापक ) तसेच लोकमंगल संस्थेचे प्राचार्य श्री योगेश गायकवाड सर, ताटे सर, निदेशक रणजित गाडे सर, संध्याराणी शिंदे मॅडम, बाळासाहेब जाधव सर, संभाजी जाधव सर, राहुल

गवळी सर आणि लोकमंगल औद्योगिक प्रशिक्षण संस्थेचे 100 विद्यार्थी यांची कार्यक्रमासाठी उपस्थिती होती.

दरवर्षी डिसेंबर महिन्यामध्ये 3 तारखेला जगभरात जागतिक दिव्यांग ( अपंग) दिन म्हणून साजरा केला जातो. संयुक्त राष्ट्र संघा तर्फे सन 1992 पासून.जागतिक दिव्यांग ( अपंग) दिन जाहीर करण्यात आला.

या दिनाच्या निमित्ताने दिव्यांग व्यक्ती बाबत सर्वसामान्य जनतेत ( समाजामध्ये) जनजागृती व्हावी या उद्देशाने दिव्यांग दिन साजरा करण्यात येतो तसेच समाजातील प्रत्येक घटकांनी दिव्यांगांच्या प्रती, सहानुभूती न दाखवता त्यांना संधी देऊन त्यांचा आत्मविश्वास वाढवण्यासाठी प्रेरित करणे आवश्यक आहे.जागतिक दिव्यांग ( अपंग) दिनाच्या निमित्ताने दिव्यांग व्यक्तीच्या समस्या समजावून घेता याव्यात याबाबत समाजात जनजागृती व्हावी, अपंगांचे प्रश्न जाणून घेऊन त्यांच्या उद्धारासाठी मदत मिळावी. म्हणून या दिवसाची योजना आहे